नि.दि.दा.क्र.३३४/२०२३
सुजित -वि- देवयानी
**CNRNO.-MHBI800-1118-2023**

## <u>नि.क्र. ११ वरील आदेश</u>

( दि. ०१ एप्रिल, २०२४ रोजी पारीत)

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मौजे केसापुरी, ता.माजलगाव,जि.बीड येथील गट नं.१० याचे क्षेत्रफळ ०३ हे.७२ आर. पो.ख. ०० हे. ०१ आर. असे मिळुन एकुण ०३ हे. ७३ आर.या संपुर्ण जमीनीची मोजणी करण्यासाठी तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय माजलगाव यांची नियुक्ती करण्यासाठी दिलेला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादींनी वादीच्या जमीनीवर अतिक्रमण केलेले आहे. वादग्रस्त जमीनीची मोजणी केल्यास वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणार आहे असे कथन करून अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी सदर अर्जावरच म्हणणे देवुन त्यांचा आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादीचे कथन की, अर्ज संयुक्तिक नाही. अर्जातील कथने त्यांना मान्य नाहीत. वादी मोजणी फीस भरण्यास तयार असल्यास त्यांचा आक्षेप नाही, नसल्यास प्रतिवादीची विनंती की, अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. युक्तिवाद ऐकला. आयोगपत्र / कमीशनच्या अनुषंगाने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ०९ मध्ये स्थानिक अन्वेषणाकरीता आयोगपत्र काढण्याची तरतुद आहे ती खालीलप्रमाणे :-

**<u>दि.प्र.सं.आदेश २६ नियम ०९</u>**

> ज्या दाव्यांमध्ये एखादया वादग्रस्त बाबींवर अधिक प्रकाश पाडण्याकरीता अथवा कोणत्याही मालमत्तेचे बाजारमुल्य अगर कोणतेही दरम्यानचे नफे किंवा नुकसान किंवा वार्षिक निव्वळ नफा यांची रक्कम निश्चितपणे अजमावण्यासाठी स्थानिक अन्वेषण आवश्यक किंवा उचित आहे असे न्यायालयास वाटल्यास त्या दाव्यांत, न्यायालयास त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तीला, असे अन्वेषण करण्याचा व त्यावरील प्रतिवृत्त न्यायालयास कळविण्याचा आदेश देणारे आयोगपत्र काढता येईल.परंतु, अशी आयोगपत्रे कोणत्या व्यक्तिंना पाठविण्यात यावीत यासंबंधी राज्य शासनाने नियम केलेले असल्यास, न्यायालय अशा नियमांस बांधलेले असेल.

५. सदर तरतुदीनुसार वादग्रस्त बाबीवर अधिक प्रकाश पाडण्याकरीता आवश्यक व उचित वाटल्यास आयोगपत्र काढता येईल. याठिकाणी दाव्यामध्ये वादग्रस्त बाब काय आहे हे पाहणे आवश्यक आहे. वादीने प्रस्तुतचा दावा वादग्रस्त जमीनीवर प्रतिवादींनी केलेल्या

१० आर. अतिक्रमीत जमीनीचा ताबा प्रतिवादीकडुन वादींना देण्यात यावा यासाठी दाखल केलेला आहे. वादींच्या कथनाप्रमाणे प्रतिवादींनी केलेले तथाकथित अतिक्रमण ही वादग्रस्त बाब आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादींनी वादग्रस्त जमीनीवर अतिक्रमण केले आहे किंवा कसे, ही बाब उजेडात येणे आवश्यक आहे.

६. माझे या ठिकाणी असे मत आहे की, वादी कथन करीत असल्याप्रमाणे कमीशनरची नेमणुक करून तसेच अहवाल मागवुन दाव्यामधील वादग्रस्त बाबींवर प्रकाश पडणार आहे. वादग्रस्त बाबीच्या अनुषंगाने तथ्य समोर येण्यास त्याचा उपयोग होणार आहे. वरील कारणास्तव कमीशनरची नेमणुक करणे व अहवाल मागविणे आवश्यक व उचित वाटत आहे. अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>-: आदेश :-</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. कमीशनर म्हणुन तालुका निरीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, माजलगाव यांची नियुक्ती करण्यात येते.

३. कमीशनर यांनी :-

(१) मौजे केसापुरी, ता.माजलगाव,जि.बीड येथील गट नं.१० याचे क्षेत्रफळ ०३ हे.७३ आर. या संपुर्ण जमीनीची मोजणी करावी.

(२) वादी व प्रतिवादी यांचे महसुल अभिलेखावरील क्षेत्र व प्रत्यक्ष ताब्यातील क्षेत्राची मोजणी करावी.

(३) गट नं. १० ची हद्दबंदी करून वादी, प्रतिवादीचे क्षेत्रावर अतिक्रमण असल्यास मोजणी नकाशामध्ये दर्शवुन हद्दीखुणा निश्चित कराव्यात.

(४) सविस्तर मोजणी नकाशा व पंचनाम्यासह अहवाल सादर करावा.

४. वादी यांनी मोजणीसाठी आवश्यक असणा-या सर्व कागदपत्रांची पुर्तता व मोजणीसाठी आवश्यक तरतुद करावी.

५. वादी यांनी नियमाप्रमाणे मोजणी फी संबंधीत कार्यालयात जमा करावी.

६. येणेप्रमाणे रीट जारी करावे.

RAVINDRA ANANDRAO SAWANT

Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT
Date: 2024.04.01 17:34:38 +0530

(र.आ.सावंत)
सह दिवाणी न्यायाधिश(क.स्तर)
माजलगाव.

दि.०१.०४.२०२४

**CERTIFICATE**

" I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order"

| | |
|---|---|
| Dictated on | 01/04/2024 |
| Transcribed On | 01/04/2024 |
| Checked & signed on | 01/04/2024 |

Sd/-
( P.P.Andurkar )
Steno Gr-III,
Jt.C.J.J.D. Majalgaon.